माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ६१/२०२०**

**अपिलार्थी श्री. विनोद ग. देसाई**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी-०३, जी/उत्तर,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. अभियंता (इ.व.का.), पहिला मजला,
हरिश्चंद्र केलवे मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०० ०२८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता,**
जी/उत्तर विभाग कार्यालय, १ला मजला, खो. क्र. ३७,
हरिश्चंद्र केलवे मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०० ०२८

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०६.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्ट नुसार दि. ११.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ४५५४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १६५६/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०३.०१.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहेत."*

उक्त आदेशानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी- ०३, जी/ उत्तर, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक अभियंता (इ व का), दादर (प.), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०३.०२.२०२० व स्मरणपत्र दि. ०७.१२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी- ०३, जी/ उत्तर, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक अभियंता (इ व का), दादर (प.), मुंबई यांच्याकडून आयोगास अहवाल प्राप्त झालेला नाही.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २४.०६.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे तक्रारकर्ता यांना हवी असलेली माहिती तक्रारकर्ता यांना दि. १६.०१.२०२० रोजी विनामुल्य देण्यात आलेली आहे व तक्रारकर्ता यांचे समाधान झालेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांची माहिती मिळाल्याची व समाधानी झाल्याबाबतची नोंदही आयोगासमोर सादर केली.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२५**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**